R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



एकूण पाने २०
प्रती अंक ₹ ५
वर्ष ५३ वे, अंक ४था, मुंबई जून २०२२ वार्षिक वर्गणी ₹ ५०

## संपादकीय

सस्नेह नमस्कार,

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण 'समाचार'द्वारे आम्ही आपल्यापर्यंत दर महिन्याला पोहचत आहोत. या समाचार पत्रिकेतून छापण्यात आलेल्या धार्मिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि अर्थविषयक माहितीपर लेखनास आपल्याकडून आवडीची पावती मिळत आहे. समाचारच्या यशाचे श्रेय समाचारमध्ये त्याचे मत व्यक्त करणाऱ्या, लिहिणाऱ्या समाजातील मान्यवरांचे आहे. ही समाचार पत्रिका आम्ही आतापर्यंत सर्व सभासदांना विनामूल्य पाठवित आहोत व त्याचा छपाई, पोस्टेज याचा सर्व खर्च संस्था करत आहे. समाचार पत्रिकेत जागेच्या अभावी संलग्न संस्थांच्या कार्यक्रमांना व उपक्रमांच्या छायाचित्रांना योग्य ती प्रसिद्धी देऊ शकत नाही. म्हणून समाचाराचा अंक १६ पानावरून २० पाने करण्याचा आमचा संकल्प आहे. सभासदांना विनंती करण्यात येते की, आपल्या पत्त्यातील बदल/पिनकोडसहित पूर्ण पत्ता संस्थेस कळविण्यात यावा, जेणेकरून अंक वेळेवर पोहचतील याची काळजी घेता येईल.

या समाचारच्या प्रकल्पाला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी आपल्या सर्वांकडून आर्थिक सहकार्याची अपेक्षा आहे. सबब आपण आपल्या उत्पादनाची/सेवांची माहिती जाहिरातीद्वारे समाचारमध्ये दिल्यास हा समाचारचा प्रकल्प आर्थिक बळावर स्वावलंबी होऊ शकतो. तरी आपल्याला विनंती की, जास्तीतजास्त जाहिराती समाचारमध्ये देऊन या प्रकल्पास हातभार लावावा.

गेल्या समाचारमध्ये छापल्याप्रमाणे दिनांक १२ व १३ नोव्हेंबर २०२२ रोजी आपण देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचे भव्य अखिल भारतीय रौप्य महोत्सवी अधिवेशन/परिषद बडोदरा (बडोदा) गुजरात राज्य येथे भरवित आहोत. या अधिवेशनात ब्राह्मण समाजाच्या उत्कर्षाच्या तसेच त्यांचे संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने योजना राबविण्याचा आम्ही संकल्प केला आहे. मुख्यत्वे या अधिवेशनात ब्राह्मण समाजातील युवा शक्तीला संघटित करण्याच्या दृष्टीने व त्यांच्या आवडीनिवडीनुसार त्यांना उद्योजक बनविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आम्ही ठरविले आहे. या दृष्टीने उद्योग, बँकिंग, आधुनिक तंत्रज्ञान, संगणक क्षेत्रातील तसेच अर्थक्षेत्रातील मान्यवरांना आम्ही मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करणार आहोत आणि ही काळाची गरज आहे. याचा विचार करून हे अधिवेशन/परिषद यशस्वी करण्यासाठी आपल्या सर्वांचे आशीर्वाद सहकार्य व मार्गदर्शन प्राप्त व्हावे ही समर्थ चरणी प्रार्थना!

**मिलिंद सरदेशमुख**
संपादक



अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची मुखपत्रिका

**समाचार**

वर्ष ५३वे, अंक ४था,
जून २०२२
(फक्त सभासदांसाठी)

श्री. विलास जोशी
अध्यक्ष
श्री. प्रभाकर कुलकर्णी
कार्याध्यक्ष
श्री. प्रसाद ठकार
कार्यवाह
श्री. विनोद मांडके
कोषाध्यक्ष
संपादक
श्री. प्रभाकर अ. संत
कार्यकारी संपादक
श्री. मिलिंद सरदेशमुख
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही

आजीव सभासद वर्गणी ₹ ५००

प्रति अंक ₹ ५

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in

# सामूहिक व्रतबंध सोहळा



औरंगाबाद




बेळगाव




नाशिक



पुणे


HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+
Countries
Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire


परमपूज्य श्रीरामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने
श्रीमद् देवी भागवत कथा आयोजन, श्री क्षेत्र माहुर येथे
दिनांक ३१ ऑक्टोंबर २०२२ ते ६ नोव्हेंबर २०२२
।। समर्थ भक्त श्रीयुत मकरंद बुवा सुमंत (रामदासी) यांच्या
ओघवत्या व रसाळ वाणीतून श्रीमद् देवी भागवत ज्ञानयज्ञ ।।
श्रीमद् देवी भागवताचे कथा नियोजन
• भागवताचार्य मकरंद बुवा रामदासी यांची श्री देवी भागवत कथा.
• कथा आयोजन श्री क्षेत्र माहुर येथे.
• उत्तम निवास व्यवस्था.
• दोन वेळेस सुग्रास भोजन, अल्पोपहार (चहा, कॉफी).
• संपुर्ण भागवत कथेत भक्तीचे वातावरण आपण ठेवूया.
• भागवत कथेचे शुल्क रुपये १७,०००/-
• नोंदणीस सुरवात १६ एप्रिल २०२२
• नोंदणी करतेवेळी रुपये १०,०००/- भरणे आवश्यक
• मर्यादित जागा आहेत.
• भाविकांनी स्वखर्चाने नियोजित ठिकाणी यायचे आहे.
PhonePe
ACCEPTED HERE
9930513261
श्री क्षेत्र माहुर
माहुर हे क्षेत्र रेणुका देवीच्या सान्निध्याने पवित्र झालेले असून हे शक्तीपीठ आहे.
माहुर हे गाव ३० - ३५ हजार लोकवस्तीचे असून लहान आहे. लहान गावाच्या मानाने
हॉटेल्स उत्तम आहेत. बऱ्याच खोल्यामध्ये AC ची सुविधा आहे. भक्तांच्या निवासाची
व्यवस्था ४ हॉटेल्स मध्ये विभागुन केलेली आहे. सर्व हॉटेल्स २ मजल्यांची आहेत.
जिन्यांची चढ उत्तार अपरिहार्य आहे. कृपया याची नोंद घ्यावी.
टिप : माहूरच्या प्रवासासंबंधी सूचना लवकरच देण्यात येतील.
संपर्क : माया कुळकर्णी - 8451941963

# व्रतबंधाचे युवकांच्या जीवनातील महत्त्व काय?

**स. भ. श्री. मोहनबुवा रामदासी**

हिंदु धर्मात असलेल्या १६ प्रमुख संस्कारांपैकी एक संस्कार म्हणजे मौंजीबंधन किंवा उपनयन संस्कार. साधारणपणे वयाच्या ८व्या वर्षी हा संस्कार केला जातो. 'उपनयन' या शब्दाचा अर्थ 'जवळ जाणे' असा होतो, विद्या शिकवणाऱ्या गुरुच्या जवळ जाणे असा उपनयनाचा अर्थ होतो. पुर्वी गुरुकुल पद्धतीनुसार वेदांचे शिक्षण घेण्यासाठी गुरुंच्या आश्रमात शिकण्यास जावे लागत असे. तसेच कठोरपणे ब्रह्मचर्याचे पालन करावे लागत असे.

वेदाक्षरे घडे ज्यासी । तो जाणावा पुण्यराशी ।

भारत देशात गुरु-शिष्य परंपरा अनेक पिढ्यांपासून चालत आलेली आहे व पुर्वी तिचे पालन करत वेद अध्ययन व अध्यापन होत असे. शिष्यास या कालावधीत काही नियमांचे काटेकोर पालन करणे सक्तीचे असते म्हणूनच या संस्कारास व्रतबंध असेही म्हणतात. गुरुंच्याही आधी त्या बटूचे आई - वडिल हेच त्याचे गुरू असतात म्हणूनच गायत्रीमंत्राचा उपदेश वडिलांकडून केला जातो. गायत्री मंत्र हा जगाच्या कल्याणाचा मंत्र आहे.

पाळावी वेदांची आज्ञा । कर्मकांड उपासना ।
येणे पाविजे ज्ञाना । अधिकार पात्र ।।

जो व्यक्ती स्नान, संध्या, देवांची पुजा, सेवा, जप, होम, अतिथी सेवा करतो तो ब्राह्मण या गायत्री मंत्राचा अधिकारी मानला जातो. कर्ममार्गानुसार ही व्याख्या बरोबरच आहे तथापि तरी श्री समर्थांनी ब्राह्मणाची व्याख्या ब्रह्म जाणतो तो ब्राह्मण अशी केली आहे. आपल्यातील ऊर्जाशक्ती, आत्मशक्ती, ज्ञानशक्ती, इच्छाशक्ती, अंतःकरणातील प्रेरणा, समाजसेवेस वाहून घेण्याची प्रेरणा ही शक्ती म्हणजे त्या ब्रह्मतत्वाचे स्वरुप मानले आहे. या शक्तीच्या अधिष्ठानाचे जागरण करण्याचा अधिकार मौंजीबंधनानंतरच येतो. निस्वार्थी, निर्लोभी आणि संयमी अशा व्यक्तीस गायत्री मंत्राने लवकर ब्राह्मणत्व प्राप्त होते. समर्थांनी सुद्धा गायत्री मंत्राचे बारा वर्षे पुरश्चरण केले आहे. गायत्री देवी एक शक्ती आहे जिच्या कृपेने मनुष्य आपल्या आयुष्याच्या विकासमार्गात खूप पुढे जाऊ शकतो. ही देवी मनुष्यास सद्बुद्धी देणारी आणि अंतर्मनाचा शोध घेण्यास सहाय्य करणारी आहे. मन, बुद्धी, चित्त आणि अंतःकरणावर प्रभाव टाकणारी अशी आहे. तिचेच नाव सावित्री असेही आहे.

आठव्या वर्षीपासून बटू आपली कामे स्वतः करू शकतो तसेच तो स्वावलंबनास तयार असतो. बटूने आपली नित्यकामे करत करत वेदांचे शिक्षण घेणे अपेक्षित असते आणि म्हणून व्रतबंधावेळी त्यास भिक्षाही मागायला सांगितली जाते. पहिली भिक्षा तो आईकडे मागतो व त्यानंतर आणलेली भिक्षा आपल्या गुरुंच्याकडे सुपूर्द करतो, नंतर ते त्याला त्याच्या गरजेनुसार ती भिक्षा देतात. श्री समर्थ रामदासांनी भिक्षेचे अनन्य महत्त्व समजावून सांगितले आहे. रामदासी व दत्त सांप्रदायात भिक्षेस अत्यंत महत्त्व आहे. समर्थ म्हणतात भिक्षेसाठी नित्य नवनवीन प्रांत फिरत असताना, 'घरांची घरे पहावी' याचा अर्थ समाजाचे बारकाईने निरीक्षण करावे. भिक्षेमुळे व्यक्ती स्वतंत्र होतो व त्यास साधनेचा वेळ मिळतो. भिक्षेमुळे अहंकार नष्ट होतो आणि सात्विक अन्न सेवनाने वृत्ती व स्वभाव सत्वगुणी होतो. भिक्षेचा संग्रह करण्यास मात्र मज्जाव करण्यात आला आहे. अशा पद्धतीने समर्थांनी बारा वर्षे संपूर्ण हिंदुस्थानाचे पायी भ्रमण करून निरीक्षण केले व धर्मजागृती बरोबरच आणि समाजात देव, धर्म व देशाभिमान बाणवला.

आजच्या युगात व्रतबंधाचे/उपनयन संस्काराचे महत्त्व आहेच, कालानुरूप शिक्षण पद्धतीमध्ये बदल झाले असतील पण विद्यार्थीदशेतील मुलांचे मन पूर्वी आणि आज सारखेच असल्याचे जाणवते. शिक्षण घेत असताना विद्यार्थ्याने स्वावलंबन, ब्रह्मचर्य पालन आचरणात आणले पाहिजे. विशेषकरून आजकाल अनेक प्रलोभने मुलांना आपल्या ध्येयापासून दूर करण्यास सज्ज असताना, पुर्वापार चालत आलेले नियम का असावेत हे लक्षात घेतले पाहिजे. त्यावर थोडेसे चिंतन केले पाहिजे.

आधी राखावा आचार । मग पहावा विचार ।

आचारे - विचारे पैलपार । पाविजेतो

याप्रमाणे विद्यार्थ्यांनी आचार, विचारावर लक्ष दिले तर ध्येयप्राप्ती सहज शक्य होऊ शकते. आजच्या विज्ञानयुगातही मनाचे व शरीराचे आरोग्य जपण्यासाठी आपल्याला पुर्वापार चालत आलेल्या संस्कारांचा आधार घेता येतो हेच पुन्हा एकदा अधोरेखित करावे वाटते. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ (मुंबई) समर्थांना अभिप्रेत अशा मौंजीबंधन सारख्या संस्कारांना जपण्याचे कार्य करतो आहे व विविध उपक्रम राबवत असतो. अशा उपक्रमांना समर्थांचे आशीर्वाद व माझ्या शुभेच्छा.

**स. भ. श्री. मोहनबुवा रामदासी**
(कार्यकारी अध्यक्ष)
आनंदी - नारायण कृपा न्यास, खातगाव ता. कर्जत जि. नगर. मोबाईलः ९१४६८५५६९१

## व्रतबंध-एक उत्तम संस्कार

**अनुराधा अ. मोहिदेकर**
(दे. ऋ. बा. संघ डोंबिवली, मो. : ९८१९९७१०४१)

उच्च कुलातील वंश आपुला
ब्रह्म विद्या अंश त्यातला
ब्राह्मण म्हणूनी मान वाढला
विद्यादाने समाज घडला
संस्काराचे लेणे लेवून आज झाले हे उपनयन
स्नान संध्या नित्य करावी.
ब्रह्म गाठही यज्ञोपविता
संथा घेऊन गायत्रीचे कर तू पुनःचरण
ब्रह्म जाणतो तोची ब्राह्मण
वेदांचे जो करी संवर्धन
अर्थ, ऋग्वेद, यर्जुवेदांचे
यज्ञोपवित हे त्रिपदरांचे
ब्रह्मगाठ ही सामवेद करी मंत्रोच्चारण
आज तू झालास ब्राह्मण....

अशा ह्या संस्कारांनी बटु खरेखुरे द्विज बनतात. त्यासाठी त्याचे मातापिता धन्य, कृतकृत्य झाले असेच म्हणावे लागेल.

पण हा 'व्रतबंध' म्हणजे नक्की काय? केवळ हौसमौज दागदागिने, नवे कपडे, जेवणावळी वगैरे का? नक्कीच नाही. त्यालाही काही शास्त्राचा आधार आहे. संस्कृती आहे, परंपरा आहे. जी आजच्या काळालाही अत्यावश्यक आहे.

आता बघा **उपनयन** म्हणजे काय तर ज्या विधीने अंतःचक्षु उघडावास प्रारंभ होतो. सहाय्य होते. मुंज झाली म्हणजे बालपण संपले. कारण ह्या विधीच्या अगोदर बालकाला कसलेही बंधन नसते. पण **व्रतबंध** या व्रताने धर्म नियमाने वागण्याचे बंधन येते.

या व्रतवंधनातील प्रत्येक विधीला एक अनन्य साधारण महत्त्व आहे. मुंज लागण्यापूर्वी बटूला शेंडी ठेवली जाते. सर्व केस काढून टाकले जातात. याला कारण शरीराची अंतर्बाह्य शुद्धता. केसाची शुद्धता का तर – पुराणाच्या संदर्भानुसार कलीचे (दुष्ट प्रवृत्तीचे) वास्तव्य केसात असते. त्यासाठी केशवपन. म्हणूनच शेंडी व सूत्र (यज्ञोपवित) हे हिंदू संस्कृतीचे प्राण आहेत. यांच्या शिवाय कोणतेही धर्मकार्य होत नाही.

ब्राह्मणांची मुंज आठव्या वर्षी केली जाते. त्यानंतर प्राचीन काळी त्या बटूला १२ वर्षे गुरूगृही आश्रमात जाऊन राहावे लागे. तेथे ४ वेद, ६४ कला, १८ पुराणे, उपनिषदे, धनुर्विद्या इत्यादी असे सर्व प्रकारचे ज्ञान संपादन करून साधक बनावे लागत असे. की जो पुढील जीवन समर्थपणे जगण्यास सक्षम होईल. त्यासाठी मुंजीतले संस्कार करणे आवश्यक आहे. प्रत्येक संस्कारामागे एक कारण आहे.

मुंजीतल्या विधीतला एक विधी मातृभोजनाचा. कुमाराचे आईसह तिच्या ताटात जेवायचे शवेटचे जेवण. त्यानंतर त्याचा पुनर्जन्म होणार असतो. इथे आचरणाचे बंधन असते; मुंजीला उभे राहताना बटुला कौपीन (लंगोटी) नेसवली जाते. यासाठी त्रिगुणी–तिहेरी केलेले कापडाचे सूत बटुच्या कमरेला नेसवतात. त्रिगुणी दोरा हे त्रिगुणाचें प्रतिक तर लंगोटी हे ब्रह्मचार्याचे प्रतिक आहे. हातातला दंड निर्थय होण्यास मदत करतो. यज्ञोपवित– यज्ञ+उपवित असा हा शब्द आहे. वित म्हणजे विणलेले धागे. ते ९ तंतूंचे बनविलेले असून प्रत्येक तंतूवर एकेका देवतेची स्थापना होते. या ९ तंतूची एकेकात तीन असे तीन धागे विणतात. त्यावर ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद यांची स्थापना करतात ते अत्यंत पवित्र मानले जाते.

## भिक्षाग्रहण

हा एक महत्त्वाचा विधी. पूर्वीच्या काळी बटुने होमासाठी व पुरोहितांच्या भोजनाला लागेल एवढी तांदळाची भिक्षा मागावी असा प्रघात होता. ''ॐ भवती भिक्षांदेही'' असे म्हणत आई, वडील, बहीण, मावशी, आत्या इत्यादी आप्त यांच्याकडे भिक्षा मागावी.

## हेतु

भिक्षा मागितल्याने अहंभाव कमी होतो. आचार्यासाठी भिक्षा मागितली आहे तेव्हा त्यांच्या उदरनिर्वाहाचे दायित्व आपल्यावर आहे याची जाणीव होते. तसेच भिक्षान्न आधी आपण न खाता ते आचार्यांना अर्पण करायचे आहे आणि नंतर त्यांनी दिलेले आपण ग्रहण करायचे. यात होम व पुरोहित यांच्या भोजनास लागेल एवढीच भिक्षा घेण्याचा अधिकार आपला आहे हे ही बटू शिकतो. यातूनच अधिकार व कर्तव्ये यांची शिकवण मिळते. या शिवाय ऋषिकुळात आपल्या आप्तस्वकीयांपासून दूर राहून सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपल्या गुरूंनी जी जी जबाबदारी आपल्यावर टाकली आहे ती निष्ठेने, श्रद्धेने, नम्रतेने पार पाडणे हे बटूंचे कर्तव्य मानले

जाई. इथे करावी लागणारी कामे... पाणी भरणे, इंधन जमा करणे, आश्रमाची साफसफाई, विद्याभ्यास, श्रवण मनन, पठण इत्यादी. आता गुरुगृही नाही तर स्वतःच्या घरी राहून हे करायचे आहे. कारण आत्ताच्या काळात त्याचे आईवडीलच त्याचे गुरू आहेत.

मुंज लागल्यावर वडील मुलाला गायत्री मंत्राची दीक्षा देतात. हा मंत्र तेजाचा आहे. त्यामुळे आपला काय व कसा फायदा होणार हे वडिलांनी मुलाला सांगितले पाहिजे. आज मुलाला शाळेत जाऊन विद्यार्जन करावे लागते पण त्याचबरोबर संस्काराचे धडे घरातून गिरविले पाहिजेत.

## राष्ट्रवादाचे प्रणेते : समर्थ रामदास

**डॉ. देवीदास पोटे** (मो. : ९८२०३३२१२८)

महाराष्ट्राची संत परंपरा महान आहे. ज्ञानदेवाची 'ज्ञानेश्वरी', तुकारामांचे अभंग, एकनाथांचे एकनाथी भागवत याबरोबरच समर्थ रामदासांचा 'दासबोध' हा ग्रंथ लोकमान्य झाला आहे. या चार ग्रंथांना महाराष्ट्राचे 'चार वेद' असे म्हणतात. समर्थांचे अध्यात्म, तत्त्वज्ञान, तत्त्वचिंतन यामधील महत्त्वपूर्ण योगदान यावरून दिसून येते. भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात समर्थांचे कार्य निश्चितच आगळे वेगळे आहे.

समर्थांनी बारा वर्षे भारतभर भ्रमंती केली. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत त्यांनी अवघा भरतखंड पालथा घातला. या भ्रमंतीमुळेच त्यांना आपल्या कार्याची निश्चित दिशा उमगली. या देशाटनात त्यांना दुःखित करणाऱ्या अनेक गोष्टी आढळल्या. धर्माला ग्लानी आली होती. उपासनांचे, कर्मकांडाचे प्राबल्य, संकुचित विचार ह्यात सारा समाज दुभंगला होता. परधर्मीय व परकीय सत्तेच्या पाशवी अत्याचारांनी इथली जनता निष्क्रीय आणि हीनदीन झाली होती. मूर्तीभंग आणि देवालयांचा विध्वंस ह्या बाबी नित्याच्याच झाल्या होत्या. त्यांनी या स्थितीचे वर्णन केले आहे :

किती गुजरीणी ब्राह्मणी भ्रष्टविल्या ।
किती शांमुखी जहाजी फांकविल्या ।।
किती येक त्या विदेशी विकिल्या ।
किती सुंदरा हाल होऊनी मेल्या ।।

हे सर्व होत असताना शूर सरदार मोगलांच्या चाकरीत धन्यता मानीत होते. माणसांची मने थिजून गेली होती. अतिशय निर्विकारपणे सारे लोक या अन्यायाकडे पाहत होते.

या सर्व परिस्थितीने समर्थांचे मन विदीर्ण झाले. पिळवटून निघाले. यावरच्या चिंतनातूनच धर्मजागृती आणि संघटना हे त्यांनी प्रमुख कार्य मानले. परकीय राजसत्ता असल्यामुळे स्वधर्म, संस्कृती यांचा विकास होत नाही हे त्यांनी जाणले. परकीय संस्कृतीच्या प्रभावाने आलेली धार्मिक अनास्था ही राजकीय गुलमगिरीमुळेच आहे ही वस्तुस्थिती त्यांनी अभ्यासिली. म्हणूनच त्यांना ओढ लागली ती धर्मजागृती आणि स्वराज्यनिर्मिती या गोष्टींची. समर्थांची राष्ट्रवादाची भूमिका या विचारातून आलेली आहे.

आपल्या कार्याची दिशा त्यांनी निश्चित केली. रामोपासना, आणि हनुमान भक्ती याद्वारे शक्तीची उपासना, अन्यायाची चीड यांची शिकवण त्यांनी लोकमानसाला दिली, भारतभ्रमणात त्यांनी द्वारकेपासून पुरीपर्यंत आणि हिमालयापासून हिंदी महासागरापर्यंत अनेक मठ स्थापन केले. रामभक्तीच्या आणि हनुमान शक्तीच्या प्रचाराद्वारे लोकजागृती, संघटित शक्तीशाली हिंदू समाज ही या सर्व मठांची कार्यपद्धती होती.

ज्या देवतांचा त्यांनी स्वीकार केला होता त्यात श्रीराम, मारुती आणि तुळजाभवानी यांचा समावेश होता. ही तिन्ही दैवते शस्त्रधारी होती. भारतभ्रमंतीने त्यांनी प्रत्येक निःशस्त्र देवाला प्रार्थना केली की, हातात शस्त्र घ्या, ही वेळ युद्धाची आहे. युद्धाला सज्ज व्हा. मारुतीच्या आरतीमध्येही त्यांनी 'रामी रामदासा शक्तीचा शोध' असे म्हटले आहे. दासबोधाद्वारे त्यांनी चार पुरुषार्थाचे सार नव्या युगाच्या अनुषंगाने दिले. हरिकथा निरूपणाला त्यांनी सक्रिय राजकारणाची जोड दिली. राज्यकर्ता राजा कसाही असो तो विष्णूचा अंशावतार आहे ही खुळचट समजूत त्यांनी नष्ट केली. राजा हा धर्माचा रक्षक, जाणता असला पाहिजे. स्वराज्यस्थापनेला प्रेरणा देणाऱ्या या विचारातून त्यांनी जणू अध्यात्माचे राजकारण केले आहे. सकाम व जयिष्णू अशा कर्मयोगाची शिकवण हे त्यांचे मोठे योगदान आहे.

समाजात चैतन्य निर्माण करण्यासाठी समर्थांनी रामनवमी आणि हनुमानजंयती हे दोन उत्सव सुरू केले.

देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा
मुलूख बडवा की बुडवावा । धर्मस्थापनेसाठी ।।

असे त्यांनी लोकांच्या पौरुषेय भक्तिला आवाहन केले. आदर्श कुटुंबव्यवस्था निर्माण करून देशप्रेमी आदर्श लोकप्रजा निर्माण केली पाहिजे हा विचार त्यांनी मांडला. हा कौटुंबिक राष्ट्रवाद मांडतांना त्यांनी सांगितले,

आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।
येथे आळस करू नका । विवेकी जनहो ।।

दैवावर अवलंबून राहणाऱ्या दुबळ्या माणसांना समर्थांनी ज्वलंत आणि जिवंत शब्दात प्रयत्न हाच देव मानून त्याची आराधना करण्यास सांगितले.

केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे
यत्न तो देव जाणावा । अंतरी धरिता बरे ।।

सामाजिक/राजकीय चळवळींना परमेश्वरी शक्तीचा सुदृढ पाया हवा, हेही त्यानी आग्रहपूर्वक सांगितले.

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।

छोटे कुटुंब हेच सुखी कुटुंब असते हा विचार मार्शलच्या लोकसंख्येच्या सिद्धांताच्या आधी त्यांनी दासबोधात मांडला आहे. ते म्हणतात,

लेकुरे उदंड जाहली । तो तें लक्ष्मी निघुन गेली ।।

जाती, वर्ण, प्रांत, भाषा यावरून संघर्ष करणे वा भेद करणे समर्थांना मुळीच मान्य नव्हते. सर्वांच्या हृदयात परमेश्वर ही अवस्था त्यांनी प्राप्त केली आहे. परमार्थाचा मार्ग सर्वांसाठी खुला करून उदार वैचारिकतेचे त्यांनी दर्शन घडविले. विविध जाती, विधवा स्त्रिया अशा सर्वांना त्यांनी अनुग्रह दिला होता. सोवळ्या ओवळ्याचे कर्मकांड समर्थांना मान्य नव्हते. स्त्रियांना सन्मानाने वागविले पाहिजे ही त्यांची काटेकोर शिकवण होती.

समर्थांचे राजनीतिशास्त्र या उद्‌गारातून प्रतीत झाले आहे. 'विमल ब्रह्म' म्हणजे परमेश्वरी शक्तीच्याच हातात असलेले राज्य आणि प्रजेचे पीडेपासून रक्षण करणारा जाणता राजा यामुळे हिंदवी राज्य हे रामराज्य आहे ही समर्थांची धारणा होती.

सतराव्या शतकात भारतीय लोकमानसापुढे आलेल्या राजकीय, सांस्कृतिक, मानसिक आक्रमणावर समर्थांनी मांडलेले विचार हाच त्यांचा राष्ट्रीय संदेश आहे, लोकमानसाला त्यांनी प्रतिपादन केलेला राष्ट्रवाद आहे, यात संदेह नाही.

# व्रतबंध/मुंज का? व कशासाठी?

**सौ. स्मिता देशपांडे** (मो. : ९४२२५३३६५६)

आपला हिंदुधर्म हा सनातन आणि अत्यंत प्राचीन धर्म आहे. त्याची निर्मिती स्थापना ऋषिमुनींनी केली. हिंदु धर्मात आचरणात आणावयाची तत्त्वे व गोष्टी यांना वैज्ञानिक दृष्टीचा व ऋतुमानाचा आधार आहे. हिंदू धर्मीयांची जीवनपद्धती व समाजव्यवस्था, समाजधारणा निर्मिती ही ४ आश्रम त्यातील १६ संस्कारांनंतर आधारीत आहे. ४ वेद व गृहितके यांत संस्काराची माहिती दिली आहे. हिंदू धर्मीयांची समाज विभागणी ही ४ वर्णाधिष्ठित आहे.

## हिंदूधर्मातील चार वर्ण

१) ब्राह्मण, २) क्षत्रिय, ३) वैश्य ४) शूद्र. प्रत्येक मनुष्याच्या अंगी वेगवेगळे गुण असतात. एखाद्या कामात तो अत्यंत हुशार, प्रवीण असतो. त्या गुण, कर्मानुसार व्यक्तींच्या कामाची विभागणी केली जाते. हिंदूमधील जातींचा उगम या चार वर्णातून झाला.

## हिंदूचे चार आश्रम

१) ब्रह्मचर्याश्रम २) गृहस्थाश्रम ३) वानप्रस्थाश्रम ४) संन्यास आश्रम या आश्रमांची विभागणी मनुष्याच्या वयानुसार व कर्मानुसार केली जाते.

## ब्रह्मचर्याश्रम

यात मुलाच्या वयाच्या आठव्या वर्षी मुंजीचा संस्कार झाल्यानंतर विद्यारंभ सुरू होत असे. तत्पूर्वी मुलाचे आई, वडील प्राथमिक संस्कार वर्णमाला, भाषा, तोंडी श्लोक पुराण कथा वगैरे शिकवत पूर्वी शाळा नव्हत्या, गुरूकुल पद्धती होती व आठव्या वर्षापासून मुलगा गुरुगृही राहायला जात असे. विद्यार्जन करण्यासाठी गुरूगृही जाऊन राहू गुरूंची सेवा करून ज्ञानार्जन करीत असे व ४/५ घरी रोज ''ॐ भवती भिक्षां देही'' म्हणून माधुकरी, भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करीत असे, यावेळी त्याला १२ वर्षे ब्रह्मचर्याचे पालन करावे लागत असे व गुरूंकडून वेदविद्या, वेदाध्यन करून शिक्षण घेत असे. १२ वर्षे 'ब्रह्मचर्य' पाळल्याने व गायत्री मंत्रामुळे मनुष्याचे 'मधो'/बुद्धी नाडी मजबूत होऊन स्मरणशक्ती असाधारण बनते. तीक्ष्ण किंवा कुशाग्र बनते. व अशा शुद्ध व सुक्ष्मबुद्धीने, मनाने विद्यार्जन केल्याने ईश्वराचे दर्शन घडते. ज्ञानार्जनामुळे मनावर संयम, कामक्रोधादी षड्रिपूंवर विजय मिळविता येतो व मनुष्याने सामाजिक, वैयक्तिक, अध्यात्मिक जीवन संस्कारामुळे चांगले घडते.

हिंदू धर्मात १६ संस्कार सांगितले आहेत. त्यात जन्मापूर्वी जन्मापासून जन्मानंतर व मृत्यूपर्यंत संस्कार सांगितले आहेत. हे १६ संस्कार पुढीलप्रमाणे–

१) गर्भाधान, २) पुंसवन, ३) सीमंतोन्नयन, ४) जात कर्म, ५) नामकरण, ६) निष्क्रमण, ७) अन्नप्राशन, ८) चौल (चूडाकर्म), ९) उपनयन/मुंज, १०) मेध जनन, ११) महानाग्रीव्रत, १२) महहाव्रत, १३) उपनिषद व्रत, १४) समावर्तन, १५) विवाह, १६) अंगेष्टी.

मुंज/उपनयन/व्रतबंध हा यातील एक 'संस्कार' आहे. संस्कारामुळे जीवनात योग्य ती दिशा मिळते, मन,

बुद्धी, शुद्ध, पवित्र, तीक्ष्ण बनते. यात मुंज करताना घेरा वा शेंडी मुलाच्या डोक्यावर ठेवली जाते. आपले 'सहस्राधार' व आज्ञाचक्रामार्फत ती चक्रे जागरूक करून गुरू ज्ञानदान करतात व शेंडीमार्फत ते ज्ञान मेंदू-बुद्धीपर्यंत पोचते. मुलाच्या मुंजीत त्याच्या कानात त्याचे वडील 'ॐ भू भूवस्वः।' हा गायत्री मंत्र सांगतात. सूर्य हा तेज, बुद्धि, उत्तम आरोग्य देणारा ग्रह आहे. मुंजीत प्रथम माधुकरी किंवा 'भिक्षावळ' गुरुगृही मुलगा जाण्यापूर्वी त्याची आई व जवळचे नातेवाईक यांनी द्यायची असते. मुंजीत जानवे किंवा 'यज्ञोपवित' मुलाच्या गळ्यातून खांद्यावर, बेंबीपर्यंत येईल असे मंत्रोच्चार करून घातले जाते. ह्या जानव्यात ब्रह्मगाठ असते, ब्रह्मा, विष्णू आदी देवतांना आवाहन करून 'गायत्री मंत्र' म्हटला जातो. मुलाने मुंजीनंतर रोज सूर्याला 'अर्घ्य' देऊन, गायत्री मंत्र म्हणून नमस्कार करायचा असतो व नियमित सकाळ, संध्याकाळ 'संध्या' करायची असते. समावर्तन संस्कार गुरुकुलातून निरोप घेण्यापूर्वी केला जात असे.

'मनुष्य जीवन शांतीपूर्ण, तणावरहीत निरोगी, सुसंस्कारीत होण्यासाठी, जीवन समृद्ध बनण्यासाठी चांगला नागरिक, चांगला समाज, चांगले राष्ट्र बनण्यासाठी संस्कार आवश्यक आहेत. उपनयन किंवा मुंजीच्या संस्काराने ब्रह्मचर्याश्रमाची सुरुवात होते. या संस्कारांमुळे धार्मिक अध्यात्मिक उन्नती होते. संस्कार म्हणजे सदाचरण, मनुष्य जी कर्मे करतो ती त्याच्यावर होणाऱ्या संस्कारातून केली जातात. संस्कार हा भारतीय संस्कृतीतून उगम पावलेला आहे. संस्कृती टिकून राहण्यासाठी संस्कार आवश्यक आहे. तो मानवी मूल्याशी निगडित आहे. त्यामुळे चारित्र्यसंपन्न पुरुष निर्माण होतो. सद्‌गुणीचा विकास, दोषाचे निराकरण, सद्‌गुणांचे संवर्धन, सात्त्विक वृत्तीची जोपासना संस्कारामुळे होते. मानवी जातीच्या उन्नतीसाठी, कल्याणासाठी संस्कार, आवश्यक आहे.

## झाडांच्या सावलीत

**सौ. स्वाती काळे** (मो. ९८९२७८९००२)

ही अग्नीफुले वेचिता

आमच्या लहानपणी अंगणामध्ये पळसाच्या झाडांचे थवे दाटीवाटीने उभे असत. पळसाच्या पानांचे द्रोण करून त्यात लोणचं पोळी खाल्ली म्हणजे आमचा पिकनिक सफल व्हायचा. रंगपंचमीच्या दिवशी हीच अग्नीफुले कढत पाण्याच्या हौदात टाकली की केशरी लाल रंग त्यात उतरायचा आणि पंचमीला असे गहिरे रंग सजायचे.

हा रंगपंचमीचा रंग कितीही प्रयत्न केला तरी लवकर निघायचा नाही.

पळस हे ब्रम्हा विष्णू महेश्वर यांचे प्रतीक. ऋग्वेदात वधूचा रथ याच अग्नि फुलांनी सजविला जातो. शिशिर ऋतूनंतर पंचवटीच्या अरण्यात बहरलेल्या फुलांमुळे वाकून गेलेल्या किंशुका झाडांचे उल्लेख रामायणात आहेत. महाभारतात देखील जमदग्नी ऋषी पळसाच्या अरण्यात यज्ञ करतात आणि त्या यज्ञाला सर्व नद्या आवर्जून हजेरी लावतात असा लोभस उल्लेख आहे.

पळस अग्नीपूजेसाठी योग्य आहे आणि अग्नीफुलांचा लाल केशरी रंग हा त्यागाचे आणि निर्वाणाचे प्रतीक आहे. त्यामुळे सर्व धर्मांमध्ये हे झाड पूजनीय आहे.

अशी गोष्ट आहे की एकदा इंद्राला खूप तहान लागली. इंद्राने देवी गायत्रीला मुजावंत पर्वतावर जाऊन सोम वेलींना तोडून आणायला सांगितले. गायत्रीने गरूडाचे रूप घेतले आणि मुजावंत पर्वतावर ती पोहोचली. पण तेथे चंद्र देवाचे रक्षक पहारा देत होते. गायत्री देवीने हळूच चोचीने सोम वेल धरली आणि तेथून पळ

काढला. पण त्यातील एका रक्षकाने, कृषाणूने गायत्रीच्या रूपातील गरुड पक्षाला बाण मारला. तो बाण गरुडाला तर लागला नाही पण सोमवेलीचे एक पान मात्र खाली पृथ्वीवर पडले आणि त्यातून पळस वृक्षाचा जन्म झाला. सोम वेली बद्दल अनेक संशोधने झाली परंतु सोम वेलीचा अर्थ म्हणजे जीवनरस देणारी वेल असा असावा. पलश वृक्ष हा जीवनरस देणारा वृक्ष आहे असा अन्वयार्थ गोष्टी मधून सांगण्यात आलेला आहे.

असेही म्हणतात की एकदा शीव पार्वती प्रणायक्रिडेत मग्न असताना अग्नि देवाचे आगमन झाले.त्यामुळे पार्वतीने सर्व देवांना शाप दिला की तुम्ही सर्वजण वृक्ष व्हाल आणि ब्रह्मदेवाचे रूपांतर पळस वृक्षात झाले.

बौद्ध धर्मात पळस वृक्षाचे स्थान फार महत्त्वाचे आहे.

एका जातक कथेत सांगितले आहे की बनारसच्या ब्रह्मदत्त राजाला चार पुत्र असतात.ब्रह्मदत्त राजा म्हणजेच भगवान बुद्धाच्या अगोदरच्या जन्मा पैकी एक जन्म. या ब्रह्मदत्त राजाच्या वेळेसच बोधिसत्वांनी किंशुक म्हणजेच पळस वृक्षाच्या रुपाने जन्म घेतला होता असेही म्हणतात.

राजाने त्याच्या चार मुलांना सारथ्या सोबत जायला सांगून पळस वृक्षाचे वर्णन करण्यास सांगितले. सारथ्याने एकाच वेळी सगळ्यांना न नेता वेगवेगळ्या ऋतूंमध्ये नेले. नंतर सर्व मुलांना ब्रह्म दत्ताने पळस वृक्षाचे वर्णन विचारले. कोणी त्याच्या हिरव्याकंच पानांचे वर्णन केले तर कोणी फळाचे वर्णन केले.कोणी लालभडक अग्नी फुलांचे वर्णन केले. राजा त्यांना म्हणाला, तुम्ही सर्वजण वेगवेगळ्या ऋतूंमध्ये गेला पण सारथ्याला त्या ऋतू शिवाय इतर वेळेस ते कसे दिसले हे कोणी सुद्धा विचारले नाही. त्यामुळे तुमच्या मनात शंका आहेत.

याच प्रमाणे निर्वाणाचे देखील आहे. मार्ग अनेक आहेत पण पोहोचायचे एकाच ठिकाणी आहे. तुम्ही वेगवेगळ्या मार्गांवरून गेलात तरी संत पदावर पोचाल. शंका बाळगू नका.

आदिम समाजात देखील पळस

वृक्षाबद्दल अनेक मनोरंजक गोष्टी आहेत. एक कोरापुत आदीम समाजाची गोष्ट खूप प्रसिद्ध आहे. पेंगू, मुरिया आणि भत्रा जमातींचा चैतू भत्रा हा नेता होता. चैतू भत्राच्या मुलीचे लग्न तिच्या इच्छेविरुद्ध लावल्या गेले आणि लग्नानंतर काही दिवसातच ती एका रुबाबदार मुरिया मुलाच्या प्रेमात पडली. गावात कुजबुज सुरू झाली आणि ती कुजबुज तिच्या नवऱ्यापर्यंत पोहोचली.

एकदा तिच्या नवऱ्याने तिला सांगितलं की तो दुसऱ्या खेड्यामध्ये जाऊन येतो पण दिवसभर जंगलातच तो लपून बसला आणि जशी रात्र झाली तसा त्याच्या झोपडीकडे निघाला. तो मुरिया मुलगा त्याच्या झोपडीतच होता. नवऱ्याने दोघांनाही मरेस्तोवर बेदम चोप दिला आणि दोघांची शवे जंगलात आणली. दोघांचे रक्ताचे ओहोळ एकमेकात मिसळले होते आणि त्यातूनच लाल आणि काळी अशी पळसाची अग्नी फुले जन्माला आली.

असा हा बहुरूपी पळस वृक्ष बहुगुणी देखील आहे. पोटात घेतल्यावर देखील गुणकारी आहे. जंतुनाशक आहे . त्वचेला देखील फायदेशीर आहे. घरात दूध दुभतं चांगलं होण्यासाठी वासरांना देखील पळसाची जादूची छडी लावली जाते.

# पहिला संस्कार

**सना पंडित** (मो. : ७७०९०४७९३३)

माणसाची कृती आणि कृतीशीलता हे त्याचं व्यक्तिमत्व सांगतात. त्याने पहिला श्वास घेतल्यापासून त्याचा कालखंड सुरू होतो. त्याला कशाचंही संज्ञान नसताना तो पहिली क्रिया काही करत असेल, तर

ती श्वास घेणे. आणि हे श्वास घेणे स्वयंचलित आहे. आणि तेच जिवंतपणाचं लक्ष्मण आहे. डोळे उघडण्याआधीच श्वास घेतल्या जातो. त्यामुळे आपण कुठे श्वास घेतो ते ही महत्त्वाचं. नैसर्गिक जडणघडणीत जे शरीर आणि शरीरधर्म येतात, तेव्हढेच जन्मतः येतात. गर्भात मुळ धरणं म्हणजे हृदय धडधडणं. मग एकेक अवयव आणि मग मेंदू. आठव्या महिन्यात गर्भार स्त्रीला फार जपायचं असतं कारण गर्भारपणातील शेवटच्या टप्प्यात मेंदूचा विकास होत असतो. हा विकास म्हणजे मेंदूच्या अवयवांचा, अंतर्गत ज्या कोशिका आहेत त्यांचा, जे वाहिन्यांचं जाळं आहे त्यांचा आणि ज्ञानेंद्रियांचे केंद्र ही. हा विकास फक्त अवयव म्हणून सर्वोच्च महत्त्वाचा असतो, कारण मेंदू सामान्यपणे स्वस्थ असणं, हे जगताना, जगणं शिकताना, व्यक्ती घडताना महत्त्वाचं असतं.

जन्माला आल्यावर माणसाचा मेंदू हा फक्त एक अवयव असतो. त्याला ज्या प्रेरणा, सूचना, चालना दिल्या जातात, तशा तशा त्याकडून प्रतिसादात्मक कृती, लक्षणं दिसतात. कुठल्याही प्राण्याच्या मुळ प्रेरणा म्हणजे आहार, निद्रा, भय, मैथून. ह्या पैकी आहार ही प्राथमिकी सर्वात पहिले आपल्याला अवगत होते. भूक लागली की रडणे, इतकंच त्या अर्भकाला कळतं. खरं तर कळत नसतं, आपल्याला काय होतंय, याचं ज्ञान त्या अर्भकाला नसतं. ती अंतर्गत रचना असते. जेणेकरून पोटाला अन्नाची (अन्न म्हणजे दूधच, ज्यात पाणी अधिक असतं)गरज आहे, हा संदेश संप्रेरक मेंदूला देतात. पण पालकांना पोट भरायचं तेव्हढंच कळतं. कारण त्या बाळाला मल मूत्राचंही कळत नसतं. ती एक स्वयंचलित शारीरिक प्रक्रिया असते. त्या बालकाचा विसर्जन क्रियेवरही अमल नसतो. श्वास घेऊन, खाऊन जगणारं एक शरीर, इतकीच प्रत्येक व्यक्तीची ओळख. खरं तर ती त्याच्या अस्तित्वाचा दाखला.

त्याला जगणं शिकवणारी मंडळी आधी त्याची ज्ञानेंद्रिय विकास करतात. नाक तर जन्मल्यापासून वापरल्या जातं. त्यामुळे नाक ते मेंदू कार्यप्रणालीत सगळंच स्वतंत्र आणि स्वायत्त. मग लगेच येतो तो स्पर्श. हा स्पर्श अनेक क्षेत्र आणि परिभाषेत येतो. तेच आपण पुढे पाहणार. दुग्धप्राशनाने शरीरावर संस्कार सुरू होतात. तसेच ते मेंदूवर ही होतात. पोटाचा आणि मेंदूच्या प्रतिक्षेप आणि प्रतिसाद सुरू होतो. पण स्पर्श. इतकासा आहे, पण खाली टाकलं की रडतो, हातात झुलवलं की शांत. कसं कळतं नं? हे प्रत्येक घरात ऐकल्या जातं. अगदी कौतुकानं. त्या बाळाला गर्भातील अलवार, गुबगुबीत स्पर्शाची सवय असते. बाहेर येऊन ही हात पाय जवळ घेऊनच ते कित्येक दिवस असते. तद्वतच कोणाच्याही कुशीत त्याला ती उब मिळते. मांस, रक्ताच्या स्पर्शाच्या जे जे जवळपास असेल, त्यात ते बाळाला सुरक्षित वाटतं. ती सुरक्षितता शोधण्यासाठी ते कडेवर पलटतं, पुढे सरकतं, कोणी नसलं की रडतं. आजूबाजूस कानोसा घेतं, आवाजाच्या दिशेने वळतं. अंगाचा, कपड्याचा स्पर्श हळूहळू त्याला ओळखीचा आणि सरावाचा होतो. आणि मग तो पाळण्यात ही राहतं. जरा एकटेपणाची जाणीव आली की असुरक्षित होतं आणि कुठली तरी कृती ते बाळ करतं. कोणाचं तरी लक्ष जावं म्हणून. मेंदूची स्मरणशक्ति, आकलन, तर्क शक्ति, मीमांसा विकास होण्या आधीचा संस्कार म्हणजे सुरक्षितता. स्पर्शाच्या भाषेने मनावर केलेला पहिला संस्कार. इथून अदृश्य असलेलं मन घडायला लागतं. कारण जवळची कोणीही व्यक्ति त्या जीवाला जपतच असते, माणसांमधे आपण सुरक्षित आहोत हे त्याच्या ींल लेपीलळेंी ळपव मधे पक्कं होतं. माणूस समाजाशिवाय म्हणूनच राहू शकत नाही. आणि स्पर्शाशिवाय ही नाही. प्रेमाने जवळ घेणं, डोक्यावरून पाठीवरून हात फिरवणं, पाय दाबून देणं, चुकलं तर एखादी चापट मारणं, खांद्यावर हात ठेवणं, केसात तेल चोळणं, केस पुसून देणं, पाया पडणं..... हे सगळे स्पर्श सुरक्षिततेची खात्री भरत असतात. ही बाह्य कृती मानसिक आणि भावनिक सुरक्षितता देतात.

जन्मल्यानंतरचा पहिला संस्कार 'सुरक्षितता'.

सगळे संस्कार ह्या संस्कारानंतरच subconscious mind मधे कायम ठाकतात.

# संलग्न संस्था विशेष

✻ **पुणे –** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था पुणे या संस्थेच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शुक्रवार दिनांक ६ मे २०२२ रोजी श्री एकनाथ मंगल कार्यालय ५२४ बुधवार पेठ पुणे २ याठिकाणी सामुदायिक व्रतबंध हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये १४ बटूंवर व्रतबंधाचे संस्कार करण्यात आले या १४ बटूंपैकी एक कन्या बटू होती आणि तीचे नाव कु. तेजोनिधी पतंगे. या कार्यक्रमाचे पौरोहित्य श्री. राहुल जोशी गुरुजी यांनी केले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर सुरेश धायगुडे, सर्व विश्वस्त व कार्यकारी मंडळ सदस्य (पुरुष व महिला शाखा) उपस्थित होते. या कार्यक्रमाला समाजामधून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

✻ **नाशिक –** देशस्थ ऋग्वेदी संस्था, नाशिक महिला शाखेचा चैत्रगौरी निमित्त हळदी कुंकू समारंभ साजरा – प्रतिवार्षिक चैत्रगौरी निमित्त हळदी कुंकवाचा कार्यक्रम संस्थेच्या महिला शाखेने सोमवार दि. २५/४/२०२२ रोजी संस्थेच्या श्री दुर्गा मंगल कार्यालयात संपन्न झाला. या कार्यक्रमास संस्थेच्या महिला सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदविली. संस्थेच्या महिला शाखा कार्यवाह सौ सविता कुलकर्णी, सहकोषाध्यक्षा सौ. अनघा धोडपकर, सौ. कुमुदिनी कुलकर्णी, सौ. संगीत कुलकर्णी, श्रीमती विदुला नांदुर्डीकर, श्रीमती सुचेता देवरे, सौ राजांनी जालिहालकर, सौ अगस्ते आदी महिला उपस्थित होत्या.

✻ **बेळगाव –** दे. ऋ. ब्रा. संघ आणि समर्थ को.ऑप. क्रेडिट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सामुदायिक उपनयन विधी आयोजित करण्यात आल्या होत्या. दि. ११ मे २०२२ रोजी चिदंबरनगर येथील चिदंबरेश्वर मंदिरामध्ये आयोजित या कार्यक्रमामध्ये सकाळी ११.२२ या शुभमुहूर्तावर बटूंच्या माथ्यावर अक्षता टाकून त्यांना आशीर्वाद देण्यात आले. त्यानंतर बटूंना ब्रह्मोपदेश करण्यात आले.

या कार्यक्रमात अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष श्री. विलासराव जोशी, कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, डोंबिवली संघाचे अध्यक्ष जे. के. जोशी तसेच मध्यवर्ती मंडळाचे विश्वस्त मिलिंद सरदेशमुख हे उपस्थित होते. या सर्वांचा सत्कार बेळगाव दे.ऋ.ब्रा. संघाचे अध्यक्ष विजेंद्र गुडी व कार्याध्यक्ष सुहास कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समर्थ सोसायटीचे चेअरमन अजय सुनाळकर, अरुण कुलकर्णी, अरविंद कुलकर्णी, राघवेंद्र केसनूर, अभय जोशी, प्रदीपकुमार कुलकर्णी, चंद्रशेखर आळतेकर, छाया जोशी, सुनंदा आळतेकर उपस्थित होते.

✻ **कल्याण –** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण शाखेचा २९वा वर्धापनदिन तिथीनुसार अक्षय्यतृतीयेच्या शुभ मुहूर्तावर व चैत्र गौरी हळदी कुंकू हे दोन्ही कार्यक्रम संस्थेच्या कार्यालयात सुनियोजित रितीने पार पडले. यावेळी आपले आद्य गुरू व श्री गणेश प्रतिमांचे पुजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी कल्याण जनता सहकारी बॅंकेचे संचालक श्रीमान यशवंत पांगारकर, उद्योजक सदस्य मकरंद पुंडलिक, संस्था अध्यक्ष सुरेश कुळकर्णी व इतर मान्यवर सभासद, हितचिंतक, कार्यकारणी सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महिला कार्यकारणी सदस्यांनी बहुमोल सहकार्य केले. सर्व उपस्थितांचे व मान्यवरांचे आभार कार्यकारणी उपाध्यक्षा सौ. डॉक्टर वैजयंती पतकी यांनी मानले.

✻ **डोंबिवली –** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली या संस्थेची ५३वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १ मे २०२२ रोजी वरद सभागृह, श्री गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली येथे अत्यंत नेटकेपणाने पार पडली. या सभेत वार्षिक अहवाल वाचन, जमाखर्च, अंदाज पत्रक, नवीन अंतर्गत हिशोब तपासनीस यांची

निवड, इत्यादी कार्यक्रमपत्रिकेत ठरलेले विषय मांडण्यात आले व सर्व ठराव बहुमताने मंजूर झाले.

त्यानंतर संस्थेचे नवीन विश्वस्त मंडळ जाहीर करण्यात आले. यावेळी संस्थेच्या कार्यकारिणीच्या एकोणीस जागांसाठी जाहीर केलेल्या निवडणुका बिनविरोध पार पडल्या.

विश्वस्त मंडळ : १) अविनाश कुलकर्णी (अध्यक्ष), २) नारायण रत्नपारखी (कार्यवाह), ३) अरविंद हस्तेकर (सदस्य), ४) दीपक देशपांडे (सदस्य), ५) सौ. अलकाताई मुतालिक (सदस्य)

कार्यकारी मंडळ पदाधिकारी : १. जे.के. जोशी (संस्था अध्यक्ष), २. विकास महाशब्दे (उपाध्यक्ष), ३. नरेश कुलकर्णी (कार्यवाह), ४. सौ. नीलिमा चिंचणकर (सह कार्यवाह), ५. श्रीमती अनुराधा मोहिदेकर (सह कार्यवाह), ६. धनंजय जोशी (कोषाध्यक्ष), ७. सौ संजीवनी कर्डेकर (सहकोषाध्यक्ष)

कार्यकारिणी सदस्य – १२ नियुक्त्या व कामाच्या सुलभीकरणासाठी सात अन्य समित्या गठित केल्या आहेत.

निवडणूक प्रक्रिया उत्तम प्रकारे पार पाडल्या बद्दल निवडणूक अधिकारी श्री. रमेश कुलकर्णी, श्री. मुकुंद पाटील व श्री. विलास अराणके यांनाही पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला.

खालील प्रमाणे काही विशेष सत्कारही संस्थेकडून करण्यात आले.

१) संस्थेचे विश्वस्त श्री. दीपक देशपांडे व सभासद दीपक कुलकर्णी (यांनी पायी नर्मदा परिक्रमा केली)

२) श्री. संजीवनी कर्डेकर (यांनी उदारहस्ते मोठी देणगी रुपये २५१०००/–दिल्याबद्दल)

३) श्री. विजय जोशी (संगणक तज्ञ) आणि ४) ज्येष्ठ सभासद श्री. अण्णाजी कुलकर्णी

सर्वात आनंददायक घटना म्हणजे संस्थेचे अध्यक्ष श्री. जगन्नाथ जोशी यांची रिझर्व बँक ऑफ इंडिया तर्फे डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मंडळावर, संचालकपदी नियुक्ती झाली त्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

✻ **विलेपार्ले –** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ विलेपार्ले व इनर व्हील क्लब ऑफ मुंबई, पार्लेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने व मे. एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि. यांच्या सहकार्याने विनामूल्य वैद्यकीय चिकीत्सा शिबीराचे दि. २९ मे २०२२ रोजी संस्थेच्या हनुमान रोड येथील कार्यालयात आयोजित करण्यात आले होते. रक्तातील साखरेचे प्रमाण, अस्थिरोग, ई.सी.जी., स्त्रियांची स्त्री रोग तज्ञाकडून तपासणी, नेत्र चिकित्सा, दंत चिकित्सा आदीची तपासणी करण्यात आली. या शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे १२५ सभासदांनी याचा लाभ घेतला. तपासणीनंतर विनामूल्य औषध वितरणाची देखील व्यवस्था करण्यात आली होती. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत दाणी, कार्याध्यक्ष श्री. सदानंद घोटीकर, कार्यवाह श्री. प्रभाकर कुलकर्णी व महेश कुलकर्णी यांची उपस्थिती होती. शिबीर यशस्वी करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल कार्याध्यक्ष श्री. सदानंद घोटीकर यांनी सर्वांचे आभार मानले.

✻ देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, विलेपार्ले संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक व कार्यकारी सदस्य श्री. चंद्रकांत खेडेकर यांचे दिनांक २०.०२.२२ रोजी देहवसान झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो. कै. खेडेकर हे पेशाने इंजिनियर होते. त्यांनी अनेक जागतिक कंपन्यामध्ये काम केले होते. जागतिक ऋग्वेदी परिषदेच्या कामामध्ये त्यांनी सक्रीय सहभाग घेऊन ती यशस्वी केली होती. तसेच विलेपार्ले संस्थेचे ते अनेक वर्ष कार्यकारिणी सदस्य होते. त्यांची अंतरिक इच्छा होती की देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, विलेपार्लेची भव्य वास्तू उभारावी व त्या दृष्टीने त्यांचे मार्गदर्शन विलेपार्ले संस्थेला नेहमीच मिळत असे त्यांच्या अकस्मित निधनानंतर त्यांच्या पवित्रस्मृती प्रित्यर्थ त्यांचया सुविध पत्नी श्रीमती लता खेडेकर यांनी विलेपार्ले संस्थेस रुपये १,२५,०००/– (एक लाख पंचवीस हजाराची) देणगी दिली. खेडेकर कुटुंबाची विलेपार्ले संस्था आभारी आहे.

✻ **मध्यवर्ती कार्यालय –** अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ व सुश्रुषा रुग्णालय मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १ मे कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून विनामूल्य वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तातील साखरेचे प्रमाण, अस्थिरोग, ई.सी.जी., स्त्रियांची स्त्री रोग तज्ञाकडून कर्करोग तपासणी, नेत्र चिकित्सा आदीची तपासणी करण्यात आली. या शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे १०० सभासदांनी व परिसरातील नागरिकांनी या शिबीराचा लाभ घेतला.

✻ **औरंगाबाद –** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ औरंगाबाद या संस्थेच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शुक्रवार दिनांक ६ मे २०२२ रोजी कुलस्वामिनी मंगल कार्यालय, औरंगाबाद या ठिकाणी सामुदायिक व्रतबंध हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये ५१ बटूंवर व्रतबंधाचे संस्कार करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे नरेश जोशी, रवींद्र पंडित, आनंद कुलकर्णी, रवी जेवूरकर, श्रीपाद मुगुटे, अंबादास कुलकर्णी व कार्यकारी मंडळातील सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाला समाजामधून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.



## व्यास क्रिएशनसंस्थेमार्फत २०२१–२०२२ चा सेवा रत्न पुरस्कार

सन २०२१–२०२२ या वर्षाचा व्यास क्रिएशन या प्रतितयश संस्थेमार्फत दिला जाणारा मानाचा 'सेवा रत्न पुरस्कार' अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबई व ठाणे येथील संस्थेचे पदाधिकारी व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. संजीव ब्रह्मे (सीए) यांना देण्यात आला. अर्थ व सामाजिक क्षेत्रातील अतुलनीय कामगिरीबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो. **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे श्री. संजीव ब्रह्मे यांचे हार्दिक अभिनंदन!**






## वर पाहिजे

**कु. गायत्री थिटे**

पत्ता : ४७, बझार रोड, बांद्रा (प.), मुंबई–५०. दूरध्वनी : ९१४६९८३९१६.

ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ.

जन्म दिनांक : ०४ मे १९९४. गोत्र : भारद्वाज,

वय : २८, उंची : ५ फूट ३ इंच, वर्ण : गोरा,

शिक्षण : १२वी पास (इंग्रजी माध्यम)

भाऊ/बहीण : नाही

अपेक्षा : स्वतःचे घर, आईवडिल असलेला परिवार, कायम स्वरूपी नोकरी.

## ऋग्वेद भूषण - श्री. मिहीर सदानंद घोटीकर



श्री. मिहीर घोटीकर या यशस्वी उद्योजकाचा जन्म ३ ऑक्टोबर १९८१ रोजी मुंबईत झाला. प्राथमिक शिक्षण त्यांनी पार्ले टिळक विद्यालयात पूर्ण केले आणि साठे महाविद्यालयातून त्यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठतून बी.ई.ची पदवी प्राप्त केली. तदनंतर अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ फ्लोरिडा मधून त्यांनी इंजिनिअरिंगमधली मास्टर्सची पदवी मिळवली आणि नंतर त्यांनी अत्यंत मानाच्या अशा हार्वर्ड बिझनेस स्कूलमधून एम.बी.ए. पदवी देखील मिळवली. श्री. मिहीर यांचा विवाह २००८ मध्ये सौ. परिका यांच्याशी मुंबईत संपन्न झाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी अमेरिकेतच एन्गेजमेंट मॅनेजर आणि सिनिअर कन्सल्टंट म्हणून पिलग्रिम क्वॉलिटी सोल्यूशन या फ्लोरिडामधील कंपनीत काही काळ काम केले. तदनंतर बॅक्स्टर या हेल्थकेअर मेडिकल सिस्टम आणि मेडिकल डिवाईसेस बनविणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीत कन्सल्टंट म्हणून सेवा दिली. आता ते एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि. या कंपनीमध्ये एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर म्हणून कार्यरत आहेत. या कंपनीची ध्येय-धोरणे, जागतिक विक्री, मार्केटिंग, प्रॉडक्शन, ऑपरेशन्स, क्वॉलिटी, लिगल आणि कॉर्पोरेट अफेअर या सर्व जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. एच. डी. फायर प्रोटेक्ट ही कंपनी फायर फायटिंग प्रोडक्ट बनविणारी अत्यंत नामवंत कंपनी म्हणून प्रसिद्ध आहे. ऑईल आणि गॅस उत्पादन करणाऱ्या कंपन्या, पेट्रोकेमिकल, केमिकल, स्टील, ऑफशोर ड्रिलिंग, पॉवर, ॲव्हिएशन आणि अनेक मोठमोठ्या व्यापारी इमारती यांना आगीपासून संरक्षण करण्याकरिता लागणारी सर्व उपकरणे व साहित्य त्यांची कंपनी पुरवित आहे. श्री. मिहीर यांच्या नेतृत्वाखाली कंपनीने जगातील ७५ प्रगत देशांत त्यांची उत्पादने निर्यात केली आहेत. त्यांच्या कंपनीत श्री. मिहीर यांनी जास्तीत जास्त ऑटोमेशन करून विविध प्रकारच्या अद्ययावत टेक्नॉलॉजीचा उपयोग केलेला आहे. संपूर्ण भारतातील पाचव्या क्रमांकाची अत्यंत नावाजलेली व प्रगतीशील मिडीअम स्केल इंडस्ट्री म्हणून एच. डी. फायर प्रोटेक्ट लिमिटेडचा सन २०२० मध्ये गौरव झालेला आहे. असोकेम या भारतातील कारखानदारांच्या अग्रगण्य संघटनेने एच. डी. फायर प्रोटेक्ट लि.ची नामवंत ४० कंपन्यांमध्ये निवड केली होती. त्यांच्या कंपनीच्या कार्यपद्धतीचा गौरव करण्याकरिता एन.डी.टी.व्ही. या लोकप्रिय व्यापारी टी.व्ही. चॅनेलने इंडिया स्मॉल जायंट म्हणून एच. डी. फायर प्रोटेक्टचा सन २०१४ मध्ये गौरव केला आहे. श्री. मिहीर हे अमेरिकेतील स्टॅनर्ड टेक्निकल पॅनलचे सदस्य असून नॅशनल फायर प्रोटेक्ट असोसिएशन, यु.एस.ए.चे ते मानद सदस्य आहेत. एशिया ॲडव्हायझरी कौन्सिल या अमेरिकेतील संस्थेचे देखील ते सदस्य आहेत. फेडरेशन्स ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडियाचे ते बोर्ड डायरेक्टर आहेत. फायर प्रोटेक्शन असोसिएशन ऑफ इंडियाचे ते सदस्य आहेत. तसेच फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशन आणि इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर इंडस्ट्रीयल इमर्नजन्सी आणि अशा अनेक संस्थांचे ते मानद सदस्य आहेत. नुकतीच त्यांची एशियन डेव्हलपमेंट बँकेमध्ये ग्रोथ मेन्टॉर म्हणून नियुक्ती झाली आहे. श्री. मिहीर हे त्यांची पत्नी सौ. परिका यांच्यासोबत सामाजिक कार्यात देखील हिरिरीने सहभाग घेत असतात. त्यांनी हार्ट पेरेंट्स फाउंडेशन नावाचा ट्रस्ट स्थापन केला असून त्यातून ते गोरगरिब, लहान मुलांच्या हृदयाचे ऑपरेशन्स देशातील प्रख्यात रुग्णालयातून विनामूल्य करून देतात. ठाणे, मुंबई परिसरातील विविध सामाजिक संस्थांना देखील ते उदार हस्ते मदत गेली अनेक वर्षे करीत आहेत.

**श्री. मिहीर यांना मिळालेले विविध पुरस्कार :** * सन २०१७ चा एक्सपोर्ट एक्सलन्स पुरस्कार. * CNBC या सुप्रसिद्ध टीव्ही चॅनेलतर्फे सन २०१८चा स्मॉल ॲन्ड मिडीयम एन्टरप्रायझेस हा उद्योजकांकरिता असलेला पुरस्कार. * रोटरी फाउंडेशनचा सन २०१८चा वोकेशनल एक्सलन्स पुरस्कार. * महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल मा. श्री. भगतसिंग कोशारी यांच्या हस्ते कोविड योद्धा उद्योजक पुरस्कार २०२०. * असोचेम संस्थेचा स्मॉल ॲन्ड मिडीयम एन्टरप्राईजचा पुरस्कार.

श्री. मिहीर घोटीकर यांच्या कर्तृत्वाचा चढता आलेख पाहून उर अभिमानाने भरून येतो. शांत, संयमी व कर्तृत्ववान श्री. मिहीर घोटीकर यांच्या या कर्तबगारीचा अभिमान वाटतो. श्री. मिहीर यांच्या भावी आयुष्यास लाख लाख शुभेच्छा!

**- शब्दांकन : मिलिंद सरदेशमुख**



*With*

*Best*

*Compliments*

*From*

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**

Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

MRH

painttech
CONSULTANTS



Generations Technology Changes BUT HULYALKAR SAME

**Mukund R. Hulyalkar**

Visits:
**By Appointment Only**
Available on Phone
9.00 a.m. to 6.00 p.m. (For local)
10.30 p.m. to 11.30 p.m. (For outstation)

**Acrylic Distemper**

**2**

**Zinc Silicate**

**Complete Paint World**
**"Choice of Bright People"**

NATIONALIST CONGRESS PARTY
**Mukund R. Hulyalkar — Paint Technologist**
Vice-President: South Central Mumbai Dist

| | | |
|---|---|---|
| **Hon. Editor** | : | Paint India |
| ***Secretary*** | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| **President** | : | Deshastha Rugvedi Brahman Sangha, Dadar |
| ***I P President*** | | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| ***Patron Member*** | : | Winner's Academy - Thane |
| ***Member*** | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| ***Award*** | : | ISSPA Mitra Award (2012) |
| | | Udyogshree By Maharashtra State Government |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile: 9821099494 • Tel.: 022-24456214 • Fax.: 022-24314865
E-mail: painttech_con@yahoo.com • Website: www.painttechconsultants.com

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

।। संहति : कार्यसाधिका ।।

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ



## रौप्य महोत्सवी अधिवेशन / परिषद
## बडोदा (गुजरात)

चला एकत्र येऊया आपली संस्कृती जपूया!

**दिनांक १२ व १३ नोव्हेंबर २०२२**

**स्थळ : श्री दादा भगवान तीर्थक्षेत्र, केलनपुरी, डभोई रोड, वडोदरा ३९०००४ (गुजरात)**

**अध्यक्ष - श्री. विलास जोशी** **कार्याध्यक्ष - श्री. प्रभाकर कुलकर्णी**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष (वडोदरा) - श्री. नितीन शहापुरकर**

**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, वडोदरा**

**मुख्य कार्यालय** - लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०००१६
दूरध्वनी : २४३०२२७३ / २४३०७५७६ - Email: aadram@gmail.com
**बडोदा कार्यालय** - **देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ,** द्वारा उमेश अरविंद सुरतकर, "सोना" बदामडीबागे समोर, शंकर टेकडी, दांडीया बाजार, वडोदरा - ३९०००१ - दूरध्वनी : ९७१२६९२९७३ - Email: milind_tattoo@yahoo.co.in

मुद्रक, प्रकाशक आणि संपादक **श्री. प्रभाकर अनंत संत** यांनी **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळा**च्या वतीने गुरुकृपा, शॉप नं. ३, रोझरी बिल्डिंग, एम.एम.सी मार्ग, माहीम (पश्चिम), ४०० ०१६, येथे छापून **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ,** लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. संपादक **श्री. प्रभाकर अनंत संत**